खरेदीची किंमत उभयतांना मान्य व कबुल आहे किंमतीविषयी उभयतांमध्ये कोणताही वाद अगर तक्रार नाही किंमतीचे भरण्याचा तपशिल भरणा कलमात सविस्तर नमुद केलेला आहे.

४) सदरची मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची असुन ही कोठेही गहाण, दान, लिन, लिज, खरेदी, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जामिनकी, कोर्टवाद, भाऊबंदकी अगर अन्य त-हेने जडजोखमीत गुंतविलेली नाही. सदरच्या मिळकतीच्या अशा प्रकारचा अगर अन्य प्रकारचा कोणताही व्यवहार आम्ही तुमचे शिवाय अन्य कोणाबरोबर ही केलेला नाही. हे खात्रीने सांगून भरवशाने लिहून देत आहे. तसेच मिळकतीच्या चतु:सिमे बाबत व कुठल्याही कबजाबाबत अगर मालकी हक्काबाबत कुठल्याही स्वरूपाचा वाद नाही अगर सदरची मिळकत ही वादाची बाब नाही. याही उपर भविष्यात सदर मिळकतीवर उतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व बोजा आढळुन आल्यास त्यांचे संपुर्णपणे निवारण मी, माझे स्वखर्चाने करून देवू त्याची कुठल्याही प्रकारची तोषिस तुम्हांस लागु देणार नाही.

५) सदरच्या मिळकतीचा आज पर्यतचा संपूर्ण बिनशेतीसारा/करपटट्री मी भरलेला आहे त्याच्या पावत्या तुम्हांस दिलेल्या आहे.येथून पुढे सदरच्या मिळकतीचा सारा/करपटट्री व इतर सरकारी देणे तुम्ही मालक यानात्याने भरावयाचा आहे. परंतु सदरच्या मिळकतीच्या संबधात जुने सरकारी देणे निघाल्यास ते मी, माझे स्वखर्चाने भरून देवू यांची तुम्हास तोषिस लागू देणार नाही.

६) सदरची मिळकत ही कायमस्वरूपी तुम्हास विक्री केलेली आहे. तरी सदरहू मिळकत परत घेण्याची लेखी अगर तोंडी बोली नसुन तसा त्याकामी वेगळा करार मदार उभयतांत झालेला नाही.

७) सदरहु मिळकतीच्या खरेदीखताकामी येणारा संपुर्ण खर्च जसे स्टॅम्प, लिहिणावळ, नोंदणावळ, वकील फी, टायपिंग, झेरॉक्स् इत्यादी खर्च तुम्हीच केलेला व सोसलेला आहे.

९२८९ ५ ९४

पान नंबर दोन        २.

पुर्वेस      - प्लॉट नंबर ११७.

पश्चिमेस   - प्लॉट नंबर ११५.

दक्षिणेस  -  कॉलनी रोड.

उत्तरेस  -  प्लॉट नंबर ११९

येणे प्रमाणे चतु:सिमेतील वर्णन केलेली मिळकत बिनशेती प्लॉट जाणेयेणेच्या वागवहिवाटीच्या हक्कासह मिळकत दरोबस्त.

येथुन पुढे यादस्तात सोयीसाठी लिहून देणार यांचा उल्लेख मी, माझा, माझे व लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही, तुमचा व तुमचे असा केलेला आहे आणि वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट नंबर ११६ चा उल्लेख सदरची मिळकत असा सोयीसाठी करण्यात आलेला आहे.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही माझे मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे व तसेच सदरच्या मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटला माझे नांवे आहे सदरची मिळकत आज रोजी माझे कबजे वहिवाटीत व उपभोगात आहे तिचे मी कायदेशीर मालक असुन सदरची मिळकत विकण्याचा अगर तबदील करण्याचा मला पुर्ण हक्क व अधिकार आहे.त्याअनुषंगाने सदरची मिळकत मी तुम्हांस विक्री करीत असुन सदर खरेदीखताचा दस्त हा मी तुमचे लाभात लिहून व नोंदवुन देत आहोत.

३) वर कलम १ यात वर्णन केलेली सदरची मिळकतची देखभाल करणे शक्य होत नाही. त्यामुळे मी सदर मिळकतीची विक्री करण्याचे ठरविले ही बाब तुम्हांस समजली व तुम्ही माझेशी संपर्क साधुन सदरची मिळकत खरेदी करण्याची उत्सुकता दाखविली तुमचे व माझे दरम्यान व्यवहाराविषयी व मिळकतीच्या किमतीविषयी बोलणी झाली व सदरची मिळकत आहे त्याच स्थितीत तुम्हास खरेदी विक्री केलेली आहे. मिळकतीचा खरेदीचा व्यवहार हा रक्कम रूपये २,६०,०००/- अक्षरी रूपये दोन लाख साठ हजार मात्र वर पक्का झाला सदरच्या मिळकतीच्या खरेदीची किंमत ही आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर असुन मिळकतीच्या

१२०१ ८ /१४

१२) सदरची मिळकत रहीवास प्रयोजनार्थ बिनशेती झालेली आहे, मा. जिल्हाधिकारी सो.,नाशिक यांचे आदेशान्वये बिनशेती झालेली असुन तिचा बिनशेती आदेश आज रोजी कायम आहे रदद् केलेला नाही.

१३) सदरील मिळकती मध्ये येण्याजाण्यासाठी तुम्ही पुर्व व दक्षिण दिशेने असलेल्या रोडने जावे यावे सदर रस्त्याचा वापरकामी तुम्हास कोणीही हरकत, अडचण, तक्रार तसेच वाद उपस्थित केल्यास त्यांचे मी स्वखर्चाने निवारण करून देईल याकामी तुम्हास तोषीस लागु देणार नाही.

१४) सदरच्या खरेदीखताच्या दस्तांवर मुंबई स्टॅम्प ॲक्ट १९५८ अन्वये सरकारी मुल्यांकनावर आकारणी करून त्या मानाने मुद्रांक शुल्काचे ई चलन लावले आहे. व ते पुरेसे आहे.

येणे प्रमाणे हे कायम खरेदीखत आज रोजी राजीखुशीने, स्वसंतोषाने, कोणाच्याही धाक दबावास बळी न पडता लिहून व सही करून दिले असे हे कायम खरेदीखत केले असे.





लिहून घेणार

आशोक शामराव ढाके

(अशोक शामराव ढाके)

लिहून देणार

R Jadhav

(रेखा नथु जाधव)



(प्रशांत अशोक ढाके)

१२९ ७ ९४

साक्षीदार

१. शेख शेरव अनिस, मनमाड

२. वेणी. नथू जाधव

॥ श्री ॥

## कायम खरेदीखत

आज दिनांक १४/०६/२०१७ वार बुधवार ते दिवशी

कायम खरेदीखत मौजे मनमाड शहर नगरपालीका हदद्दीतील स्थावर मिळकत बिनशेती प्लॉटची व्यवहार किंमत व मुद्रांक मुल्यांकनानुसार किंमत रक्कम रूपये २,६०,०००/- अक्षरी रूपये दोन लाख साठ हजार मात्र.

झोन १ :

मुद्रांक रूपये १३,०००/-

| | |
|---|---|
| १. अशोक शामराव ढाके.<br>वय ५२ वर्षे धंदा - सेवानिवृत्त<br>२. प्रशांत अशोक ढाके.<br>वय २२ वर्षे धंदा - नोकरी<br>रा. गोदावरी कॉलनी, मनमाड<br>तालुका नांदगाव जिल्हा नाशिक | लिहून घेणार |

यांसी

| | |
|---|---|
| रेखा नथु जाधव<br>वय ४० वर्षे धंदा - नोकरी<br>रा.शांकुतल नगर, मनमाड<br>तालुका नांदगाव जिल्हा नाशिक | लिहून देणार |

कारणे कायम खरेदीखत लिहून देतो ऐसा जे की,

१) मिळकतीचे वर्णन - तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नांदगाव पैकी मौजे मनमाड शहर नगरपालीका हदद्दीतील स्थावर मिळकत बिनशेती सर्व्हे नंबर १४६/२१ यातील प्लॉट नंबर ११६ यांचे एकुण क्षेत्रफळ १०५:०० चौरस मीटर यांसी आकार ३६ रूपये ७५ पैसे मात्र यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.